मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शनिवार, दि. 25 जानेवारी 2025 | पान- 1

# 2 महिन्यांत तब्बल 600 कोटी रुपये वसुलीचे आव्हान!

## कर संकलन विभाग : हॉटेल, रूग्णालय, शाळांकडे कोट्यवधींची थकबाकी

**पिंपरी | प्रतिनिधी**

निवासी मालमत्ता, शाळा यांच्यानंतर कर संकलन विभागाने शहरातील प्रसिद्ध असलेले हॉटेल, रूग्णालय आणि शैक्षणिक संस्थांकडील थकबाकी वसूलण्यासाठी मोर्चा वळवला आहे. अनेक संस्थांकडे गेल्या अनेक वर्षांपासून 5 कोटी 4 लाख रूपयांची मालमत्ताकराची थकबाकी आहे. त्या मालमत्तांना महापालिकेच्या कर संकलन विभागाने जप्तीपूर्व नोटीसा बजावल्या आहेत. आता त्या मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या मालमत्ता धारकांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान येत्या दोन महिन्यात कर संकलन विभागास तब्बल 600 कोटी रूपयांची वसुली करण्याचे आव्हान असणार आहे.



दि.1 एप्रिल 2024 ते 22 जानेवारी 2025 या कालावधीत 18 विभागीय कार्यालयाकडून 642 कोटी 18 लाखांची वसुली करण्यात आली आहे. या कार्यालयांना 31 मार्च 2025 पर्यंत एकूण 1 हजार 250 कोटी रूपयांचे टार्गेट देण्यात आले आहे. आता पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने एक लाखापेक्षा अधिक थकबाकी असलेल्या बिगरनिवासी व निवासी मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई सुरू केली आहे. येत्या दोन महिन्यात कर संकलन विभागास तब्बल 600 कोटी रूपयांची वसुली करण्याचे आव्हान असणार आहे.

### 21 शाळांकडे कोट्यावधींची थकबाकी...

शहरातील 21 नामांकित शाळांकडे 1 कोटी 87 लाख रूपयांची थकबाकी असून यापैकी नऊ शाळा सील केल्या आहेत. शाळांना सील करताच थकबाकी भरल्यामुळे तीन शाळांचे सील काढण्यात आले आहे. 13 लहान-मोठ्या रूग्णालयांकडे 1 कोटी 37 लाख रूपयांची थकबाकी आहे. रूग्णालय चालकांना महापालिकेने जप्तीपूर्व नोटिसा बजाविल्या आहेत.

### 35 हॉटेल चालक रडारवर...

**» शहरातील विविध भागात राजकीय पुढा-यांसह उद्योजकांचे हॉटेल, बार आहेत. त्यामुळे हे हॉटेल चालक गेल्या अनेक वर्षांपासून करच भरत नसल्याचे समोर आले आहे. शहराच्या विविध भागातील तब्बल 35 हॉटेल चालकांकडे 1 कोटी 80 लाख रूपये कराची थकबाकी आहे. थकबाकी असलेल्यांमध्ये बड्या हॉटेल व्यावसायिकांची हॉटेल आहेत. या व्यावसायिकांना नोटिसा देण्यात आल्या असून कर न भरल्यास हॉटेल्स सील करण्याचा आक्रमक पवित्रा महापालिकेने घेतला आहे.**

“ नोटीसा बजावूनही प्रतिसाद न देणाऱ्या मालमत्ता जप्त करण्यात येत आहेत. संपूर्ण थकबाकी भरल्याशिवाय सील काढत नाही. एक लाखापेक्षा अधिक थकबाकी असलेल्या बिगरनिवासी मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. मुदतीमध्ये थकबाकी न भरल्यास त्या मालमत्तांचा लिलाव करण्यात येत आहे.

**- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग.**

# पिंपरी-चिंचवडचे नाव आता शिक्षण क्षेत्रातही अग्रेसर; आमदार शंकर जगताप

## डॉ. गिरीश देसाई : व्हीनस आर्ट फाउंडेशनचा डिझाईन एज्युकेशन फेअर उपक्रम स्तुत्य!

**पिंपरी | प्रतिनिधी**

कामगार नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी चिंचवड शहराचे नाव आता शिक्षण क्षेत्रात देखील पुढे येत आहे. यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठ व डी. वाय. पाटील विद्यापीठ यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. तसेच मागील पंधरा वर्षांपासून डिझाईन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्हीनस आर्ट फाउंडेशनचा देखील गौरवाणे उल्लेख करावा लागेल असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.

व्हिनस आर्ट फाउंडेशनच्या वतीने आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ, दिशा सोशल फाउंडेशन यांच्या सहयोगाने "पीसीएमसी डिझाईन एज्युकेशन फेअर २०२५" चे उद्घाटन चिंचवड ऑटो क्लस्टर येथे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, माजी विरोधी पक्ष नेते नाना काटे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती नाना शिवले, माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, व्हिनस आर्ट फाउंडेशनच्या चेअरमन अपूर्वा पाटील, अमर पाटील, संतोष निंबाळकर विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



रविवारपर्यंत सुरू असणाऱ्या या फेअर मध्ये पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना व पालकांसह सर्वांना विनामूल्य प्रवेश आहे. डिझाईन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी देशभरातील डिझाईन कोर्स उपलब्ध असणाऱ्या विद्यापीठांची माहिती दालने उभारण्यात आली आहेत. त्यामध्ये पीसीईटी डिझाईन स्कूल अँड पीसीयू आर्किटेक्चर कॉलेज, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी आकुर्डी, एमआयटी स्कूल ऑफ डिझाईन आळंदी, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (एनआयटी) अहमदाबाद गुजरात, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) न्यू मुंबई खारघर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्राफ्ट अँड डिझाईन (आयआयसीडी) अँड आयआयटी बॉम्बे, चित्रकूल एनआयडी क्लासेस चिंचवड, इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन निरमा यूनिवर्सिटी अहमदाबाद गुजरात, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन टेक्नॉलॉजी (एमआयटीएडीटी) लोणी काळभोर, महिंद्रा युनिव्हर्सिटी हैदराबाद, एरेना ॲनिमेशन पुणे आदींचा समावेश आहे.

प्रमुख पाहुणे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, डिझाईन क्षेत्राची व्याप्ती मोठी आहे. या क्षेत्रात देखील उत्कृष्ट करिअर करता येते. आज प्रत्येक क्षेत्रात डिझाईन अत्यावश्यक आहे. वस्तू विक्रीसाठी सादरीकरण खूप महत्त्वाचे आहे. हे सादरीकरण (दृश्य कलेच्या) डिझाईनच्या माध्यमातून उत्कृष्टपणे करता येते.

# खडकवासला, किरकिटवाडीला शुद्धीकरणाविनाच पाणी!

## बाधितांमध्ये सर्वाधिक लहान मुले : वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिल्या महत्त्वाच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या हद्दीत नव्याने समावेश झालेल्या खडकवासला, किरकिटवाडी, नांदोशी या भागात 'गुइलेन बॅरे सिंड्रोम'चे संशयित रुग्ण आढळून येत आहेत. या भागातील नागरिकांना ज्या विहिरीतून पाणीपुरवठा केला जातो, त्या विहिरीच्या पाण्यात दूषित पाणी मिसळले जात आहे का, याचा शोध घेण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे.

या भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीमध्ये काही तरी झिरपत असल्याची माहिती पुढे येत आहे. याचा त्यामुळे हे नक्की काय आहे, याचा शोध घेण्यास पालिकेने सुरुवात केली आहे. या भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेकडे स्वतंत्र यंत्रणा नाही. ही गावे महापालिकेच्या हद्दीत येण्यापूर्वी पाणीपुरवठा करण्याची जी व्यवस्था होती, त्याच पद्धतीने आताही महापालिकेच्या वतीने पाणीपुरवठा केला जात आहे. या समाविष्ट गावातील नागरिकांना शुद्धीकरण केलेले पिण्याचे पाणी महापालिकेच्या वतीने देण्यात येत नाही.



खडकवासला धरण क्षेत्राच्या परिसरात अनेक हॉटेल्स, रो-हाउस झाली आहेत. त्यांचे सांडपाणी थेट धरणात सोडले जात असल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला होता. महापालिका या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीत धरणाचे पाणी उचलून सोडते. हे करताना त्यावर कोणतीही प्रक्रिया करण्याची व्यवस्था महापालिकेकडे नाही. खबरदारी म्हणून 'ब्लीचिंग पावडर' विहिरीत टाकली जाते. या भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करताना आजूबाजूचे सांडपाणी या पिण्याच्या पाण्यात मिसळण्याची शक्यता असते. त्यामुळेदेखील नागरिकांना त्रास होऊ शकतो, असा अंदाज महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

'या भागातील नागरिकांच्या घरातील पाण्याचे नमुने, विहिरीतील आणि धरणातील पाण्याचे नमुने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तपासण्यासाठी प्रयोगशाळेकडे पाठविले आहेत. त्याचा अहवाल अद्याप आला नाही. हा अहवाल आल्यानंतर रुग्णांची संख्या नक्की कशामुळे वाढत आहे, याचे कारण स्पष्ट होईल,' असे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.

ज्या भागात रुग्णांची संख्या वाढत आहे. तेथील नागरिकांनी पाणी उकळून आणि गाळून प्यावे, अशा सूचना करण्यात आलेल्या आहेत. या विहिरीच्या आजूबाजूच्या सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छता सुरू करण्यात आली आहे. पाण्याचे नमुने तपासण्यासाठी देण्यात आले असून, त्याचा अहवाल अद्याप आलेला नाही, असे मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.

### अतिरिक्त आयुक्तांकडून आज विहिरीची पाहणी

» महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावातील नागरिकांना महापालिकेच्या वतीने विहिरीतून पाणी पुरवठा केला जातो त्या विहिरीची पाहणी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी हे करणार आहेत. गुरुवारी (२३ जानेवारीला) अतिरिक्त आयुक्त आणि महापालिकेतील वरिष्ठ अधिकारी या भागात जाणार आहेत. महापालिकेच्या वतीने या भागातील नागरिकांना केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्याची संपूर्ण माहिती घेतली जाणार आहे. तसेच, आजूबाजूच्या भागाची पाहणी करून पाणी दूषित होत असेल, तर त्यामागील कारणांचा तपासदेखील केला जाणार आहे. विहिरीमध्ये काही तरी झिरपत असल्याचे लक्षात आले आहे. हे नक्की काय आहे, याचा शोध घेतला जात असल्याचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज यांनी सांगितले.

# खासदार निधीतून पवनानगर, कांब्रेत विविध विकासकामांचे भूमिपूजन

## मावळात पुन्हा विकास कामांचा धडाका : खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

खासदार श्रीरंग बारणे यांच्या स्थानिक खासदार निधीतून मावळमधील काले कॉलनी, पवनानगर, ग्रुप ग्रामपंचायत कांब्रेत विविध विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन करण्यात आले. खासदार बारणे यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ, भूमिपूजन गुरुवारी करण्यात आले. खासदार बारणे यांच्या तिसऱ्या टर्ममध्ये मावळात पुन्हा विकास कामांचा धडाका सुरू झाला आहे.



खासदार श्रीरंग बारणे यांचे मावळ तालुक्यावर विशेष लक्ष आहे. मावळ तालुका वाड्या-वस्त्यांमध्ये विस्तारला आहे. त्यामुळे अनेक गावांमध्ये दळणवळणासाठी रस्त्यांचा अभाव होता. अंतर्गत रस्ते नव्हते. त्याकरिता खासदार बारणे यांनी मागील दोन टर्ममध्ये खासदार निधी आणि जिल्हा वार्षिक निधीतून मावळ तालुक्यातील अंतर्गत रस्ते करण्यावर भर दिला आहे. सिमेंट काँक्रीटचे रस्ते केले. समाज मंदिरे, पाणी टाक्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. मावळातील अनेक गावात अंतर्गत रस्ते झाले आहेत. त्यामुळे मावळातील नागरिकांना खासदार बारणे यांच्यावर विश्वास टाकत तिसऱ्यावेळी मोठ्या मताधिक्याने निवडून दिले.

आता पुन्हा खासदार बारणे यांनी विकास कामांचा धडाका सुरू केला आहे. स्थानिक खासदार निधीतून विकास कामे सुरू केली आहेत. मावळ दौऱ्यावर असताना ग्रुप ग्रामपंचायत कांब्रेसाठी दिलेल्या 50 लाखाच्या कामाचा शुभारंभ केला. त्यात सिमेंट काँक्रीटचे अंतर्गत रस्ते, समाज मंदिराच्या कामाचा समावेश आहे. त्याचबरोबर पवनानगर येथील पवना विद्या मंदिराकडे जाण्यासाठी स्थानिक खासदार निधीतून 12 लाख रुपये खर्च करून रस्ता विकसित केला होता. या रस्त्याचे लोकार्पण खासदार बारणे यांच्या हस्ते करण्यात आले.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, विकासाच्या दृष्टीकोणातून सर्वाधिक निधी मावळला दिला आहे. मावळात गावे विस्तारली आहेत. प्रत्येक गावात जाण्यासाठी तसेच अंतर्गत रस्ते करण्यावर भर दिला. त्याची पोहोचपावती जनतेने दिली. तिसऱ्यांदा मला सेवा करण्याची संधी दिली. राज्यात पुन्हा चांगल्या विचारांचे महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे निधीची कमतरता भासणार नाही. भरघोस निधी मिळत आहे. केंद्र सरकार, राज्य सरकारच्या निधीतून मावळात मोठी विकास कामे केली. यापुढेही विकास कामे सुरूच राहतील.



# मोशीचा कचरा डेपो ठरलाय हॉटस्पॉट, इस्रोच्या अभ्यासात आले समोर

## देशातील मिथेन वायू उत्सर्जनाचे 22 हॉटस्पॉट समोर आले. यामध्ये पिंपरी-चिंचवडमधील मोशीतील कचरा डेपोचाही समावेश आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

इस्रोने केलेल्या अभ्यासात देशातील मिथेन वायू उत्सर्जनाच्या २२ हॉटस्पॉटमध्ये समावेश, उपाययोजना समाधानकारक न वाटल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बजावली पिंपरी-चिंवचड महापालिकेला नोटीस

भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) केलेल्या अभ्यासात देशातील मिथेन वायू उत्सर्जनाचे २२ हॉटस्पॉट समोर आले. यामध्ये पिंपरी-चिंचवडमधील मोशीतील कचरा डेपोचाही समावेश आहे.

कोविडकाळात मोशी कचरा डेपो परिसरात टाकलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग योग्य प्रकारे झालेले नाही. जळालेले तेल मोठ्या प्रमाणात टाकण्यात आले आहे. मिथेन वायू संकलित करून त्याचे व्यवस्थापन करण्याची यंत्रणा बसविली नाही. मिथेन वायूच्या उत्सर्जनावर देखरेख ठेवण्याची यंत्रणाही केली नाही. १०० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमताही महापालिकेकडे नाही. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) याबाबत उपाययोजनांचे निर्देश देऊनही त्याचे पालन केले नसल्याबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गुरूवारी (दि. २३) पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला नोटीस बजावली आहे.

इस्रोच्या अभ्यासानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने मिथेन वायू उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होणाऱ्या ठिकाणी उपाययोजना करण्यासाठी समिती नेमली होती. या समितीने मिथेन वायू उत्सर्जन थांबविण्यासाठी अनेक उपाययोजना सुचवल्या होत्या. या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला विचारणा केली होती. त्यावर महापालिकेने उत्तर दिले होते. परंतु, ते मंडळाला समाधानकारक वाटले नाही. त्यामुळे मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कचरा डेपोला भेट देऊन तपासणी केली. त्यानंतर मंडळाने महापालिकेला नोटीस बजावली.

महापालिकेने नव्याने डेपोत कचरा टाकू नये. बायोमायनिंगसाठी कालबद्ध आराखडा सादर करावा. मिथेन वायू शोध यंत्रणेसोबत ठिकठिकाणी अग्निशमन यंत्रणा बसवावी. मिथेन उत्सर्जनावर नियमितपणे बारकाईने देखरेख ठेवावी. डेपोत टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची नोंद ठेवावी. डेपोतील १०० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करावी, अशा सूचना प्रदूषण नियंत्रण मंडळाने केल्या आहेत.



### महापालिका म्हणते, प्रदूषण नियंत्रण मंडळाची नोटीसच चुकीची

» कोविड कालावधीतील जैववैद्यकीय कचरा मोशी कचरा डेपोत टाकलेला नाही. त्या कचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट वायसीएम रुग्णालयातील केंद्रात केली आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी वर्षभरापासून बायोमायनिंग पद्धत राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहिती घेऊन नोटीस द्यावी. ही नोटीसच चुकीची आहे, असा दावा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी केला. महापालिकेच्या उपाययोजनांची माहिती मंडळाला देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

### प्रदूषण नियंत्रण मंडळाने धरले महापालिकेला धारेवर

» पिंपरी-चिंचवड महापालिकेने १५ दिवसांत मंडळाकडे दोन लाख रुपयांची बँक हमी जमा करावी. मंडळाने बजावलेल्या नोटिशीला महापालिकेने १५ दिवसांत उत्तर द्यावे. अन्यथा कायदेशीर कारवाईचे पाऊल उचलण्यात येईल, असा इशाराही प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिला आहे.

### नोटीसमध्ये काय म्हटले आहे

» कोविडकाळात टाकण्यात आलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग होत नसल्याचे तपासणीत आढळून आले. याचबरोबर जळालेले तेल तेथे मोठ्या प्रमाणात टाकण्यात आले आहे. मिथेन वायू संकलित करून त्याचे व्यवस्थापन करण्याची यंत्रणाही बसविण्यात आलेली नाही. मिथेन वायूच्या उत्सर्जनावर देखरेख ठेवण्याची यंत्रणाही तिथे नाही. याचबरोबर निर्माण होणाऱ्या १०० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमताही महापालिकेकडे नाही, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

# अखेर शिधापत्रिकेचे संकेतस्थळ सुरळीत; अर्जदारांना मिळाला दिलासा

## गेल्या आठ दिवसांपूर्वी तांत्रिक कारणाअभावी विस्कळीत झालेले शिधापत्रिका कार्यालयातील कामकाज पूर्ववत झाले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या आठ दिवसांपूर्वी तांत्रिक कारणाअभावी विस्कळीत झालेले शिधापत्रिका कार्यालयातील कामकाज पूर्ववत झाले आहे. तांत्रिक दुरुस्ती केल्यानंतर अन्न धान्य वितरण व पुरवठा विभागाच्या संकेतस्थळाचे कामकाजातील अडथळा दूर झाला आहे. नवीन शिधापत्रिका डाऊनलोड होत आहेत. मात्र आता रखडलेल्या कामाचा निपटारा करण्यासाठी अधिकाऱ्यांना अधिक काम करावे लागणार आहे.

गेल्या आठ दिवसांपूर्वी तांत्रिक कारणाअभावी विस्कळीत झालेले शिधापत्रिका कार्यालयातील कामकाज पूर्ववत झाले आहे. तांत्रिक दुरुस्ती केल्यानंतर अन्न धान्य वितरण व पुरवठा विभागाच्या संकेतस्थळाचे कामकाजातील अडथळा दूर झाला आहे. नवीन शिधापत्रिका डाऊनलोड होत आहेत. मात्र आता रखडलेल्या कामाचा निपटारा करण्यासाठी अधिकाऱ्यांना अधिक काम करावे लागणार आहे.

शिधापत्रिका काढण्यासाठी अन्नधान्य पुरवठा विभागाने शिधापत्रिकेची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर (RBMR.MAHAFOOD.GO©T.IN) ही सोय उपलब्ध आहे. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (आरसीएमएस) विकसित करून त्याद्वारे कामकाज केले जात होते. नवीन शिधापत्रिका काढणे, नावे वाढवणे, कमी करणे, विभक्त करणे अशी विविध कामे करण्यासाठी या ऑनलाईन प्रणालीचाच वापर होत आहे.

गेल्या आठ दिवसांपासून संबंधित संकेतस्थळ तांत्रिक अडचणींमुळे हळू चालत होते. परिणामी नव्याने काढण्यात येणारी शिधापत्रिका डाऊनलोड होत नव्हती. नागरिकांना शिधापत्रिका कार्यालयात हेलपाटे मारण्याची वेळ येत होती. त्याबाबत नागरिकांमध्ये तक्रारींचा सूर होता. तसेच शिधापत्रिकांचे ऑनलाईन कामकाज गेल्या काही दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे विविध शासकीय कामांसाठी तसेच कागदपत्रे म्हणून लागणाऱ्या शिधापत्रिका नागरिकांना मिळण्यास उशीर होत आहे. पर्यायाने, विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यातदेखील अडचणी येत आहेत, अशी तक्रारी स्वस्त धान्य दुकानदारही करत होते.

मात्र संबंधित विभागाच्या वरिष्ठ पातळीवरूनच संकेतस्थळ अपडेट करण्याचे काम सुरू होते. काही दुरुस्ती करण्यात आल्या आहेत. आता संकेतस्थळ व्यवस्थित चालू असून नवीन शिधापत्रिकांचेही वाटप केले जात आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या आठवड्यापासून आता संकेतस्थळ सुरळीत सुरू झाल्याने प्रलंबित कामे मार्गी लागतील.



> संकेतस्थळाबाबत काही दुरुस्ती करण्यात आल्या आहेत. सध्या येणाऱ्या अडचणी थांबल्या आहेत. नवीन शिधापत्रिका डाऊनलोड करून देण्याचे काम कार्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे.
>
> - गजानन देशमुख, मंडळ अधिकारी, पिंपरी-चिंचवड

# तुम्ही कितीही जोर लावा, आम्ही मागे हटणार नाही

## विमानतळ प्रकल्प बाधित पुरंदरमधील शेतकऱ्यांचा शासनाला इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

इंग्रजांचा कायदा लोक वस्ती पुनर्वसन करण्याचा आहे, मात्र सध्याचे सरकार शेतकऱ्यांना विस्थापित करीत आहे. आम्हाला विश्वासात न घेता शासन आमच्या गावात जबरदस्तीने विमानतळ प्रकल्प उभारीत आहे. या प्रकल्पामुळे आमची हजारो एकर जमीन जाणार असून माणसांसह जनावरे, प्राणी, पशु, पक्षी सर्वच विस्थापित होत आहे. मग आम्ही जायचे कोठे ? असा प्रश्न उपस्थित करून आमच्या नावाखाली प्रकल्प करणार आणि आम्हीच विस्थापित होणार असेल तर प्रकल्प कोणासाठी करताय ? शासनाने जबरदस्ती केली तरी एक एकर सुद्धा जमीन देणार नाही. तुम्ही कितीही जोर लावा, आम्ही मागे हटणार नाही, असा इशारा पुरंदरमधील शेतकऱ्यांनी शासनाला दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सप्टेंबरपर्यंत पुरंदरमधील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची जागा संपादित करण्याचे आदेश दिले. त्यामुळे प्रकल्पबाधित शेतकऱ्यांमध्ये पुन्हा अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यामळे प्रकल्पबाधित शेतकरी पी. एस. मेमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्चा काढून शासनाचा जोरदार निषेध केला. पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत यांना निवेदन देवून आमच्या मागण्या शासनापर्यंत पोहोच कराव्यात, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी विविध गावांचे सरपंच, माजी सरपंच यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विमानतळ प्रकल्पाला विरोध केला म्हणून आम्हाला अटक झाली आहे असे सांगून शेवटपर्यंत विरोध करीत राहणार असे महादेव टिळेकर, संतोष हगवणे यांनी सांगितले. पारगावच्या सरपंच ज्योती मेमाणे, वनपुरीच्या सरपंच राजश्री कुंभारकर, उदाचीवाडी सरपंच सविता मगर तसेच नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती महादेव टिळेकर, बाळासाहेब मगर, सुनील धिवार, बापू मेमाणे, माऊली मेमाणे, ॲड. शिवाजी कोलते यांनीही शासनाचा जोरदार निषेध केला आहे.



### आमदार शिवतारेंचे नाव न घेत...

» काही लोक प्रतिनिधी म्हणतात शासनाने रेट जाहीर केल्यावर लोक जमीन देण्यास तयार असल्याचे सांगत आहेत. अशा शब्दात नाव न घेता आमदार विजय शिवतारे यांच्याकडे अंगुली निर्देश करीत शेती हा शेवटचा पर्याय आहे. ती टिकवून राहिली पाहिजे. शेतकऱ्यांची संमती नसेल तर प्रकल्प होणार नाही. त्यामुळे कोणीही स्वाक्षरी करू नये, असे आवाहन पी. एस. मेमाणे यांनी केले आहे.

> “ शासनाने शेतीसाठी पुरंदर उपसा योजनेतून पाणी आणले. त्या जोरावर आम्ही शेतात फळबागा लावल्या, उसाचे उत्पादन घेतोय, आम्ही मोठाली घरे बांधली, शेतीवाडी तयार केली या सर्वांवर नांगर फिरविणार असाल तर आम्ही गप्प बसणार नाही. आम्हाला विस्थापित करून कोणासाठी प्रकल्प आणताय?.
>
> - शीतल टिळेकर, सरपंच, एखतपूर

> “ शेतकऱ्यांनी एकजूट ठेवावी. आम्ही आंदोलनासाठी परवानगी मागत असताना आम्हाला दिली जात नाही आणि तरीही एवढी लोक जमत असताना परवानगी मिळाल्यास किती लोक येतील याचा शासनाने विचार करावा. जमीनच राहणार नसेल तर भविष्यात खाणार काय ? त्यामुळे याबाबत शासनाने आमच्या सोबत राहावे.
>
> - मंजुषा गायकवाड, सरपंच, कुंभारवळण

> “ शेतकऱ्यांचा विरोध असताना शासन विमानतळ प्रकपाचा घाट का घालीत आहे? यापुढे आम्ही जोरदार संघर्ष करू पण विमानतळ नको ही एकच आमची मागणी आहे.
>
> - रामदास होले, माजी सरपंच, खानवडी

# बारामती बस स्थानकाचा ढिसाळ कारभार

## एसटी वेळेवर धावत नसल्याने विद्यार्थ्यांचे महविद्यालयात जाणे बंद

**पुणे | प्रतिनिधी**

सुपा ते बारामती प्रवासासाठी एकच बस आहे. तीही वेळेला येत नसल्याने या परिसरातील विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच कर्मचाऱ्यांचे हाल होत आहेत. बारामती बस स्थानकाच्या ढिसाळ कारभारामुळे हे घडत असून याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे या परिसरातील नागरिकांनी तसेच विद्यार्थ्यांनी तक्रार केली आहे. एसटी बस वेळेत नसल्याने या परिसरातील विद्यार्थी विद्यार्थिनींवर महाविद्यालयात जाणे बंद करण्याची वेळ आली आहे.

एखाद्या विमानतळाला लाजवेल अशा पद्धतीचे राज्यातील अत्याधुनिक बस स्थानक म्हणून बारामती बस स्थानकाची ओळख निर्माण झाली आहे. मात्र नुसती इमारती देखणी होऊन चालत नाही तर त्यातील कारभार देखील नागरिकांच्या हिताचा असावा अशा अपेक्षा बारामतीतील नागरिक व्यक्त करीत आहेत. बारामती बस स्थानकात सुपा परिसरातील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांची देखील हाल होत आहेत. सुपा ते बारामती एकच बस असल्याने नागरिक तसेच विद्यार्थ्यांना ताटकळत राहावे लागत आहे. कामानिमित्त नागरिक सकाळी सहा वाजल्यापासून घराबाहेर पडतात मात्र परत घरी परतत असताना त्यांना बस स्थानकातून बस उपलब्ध होत नसल्याने अनेक वेळा ताटकळत राहावे लागत आहे.

या परिसरातील प्रवाशांना येण्यासाठी दुसरी सोय नसल्याने एसटीच्या भरोशावर राहावे लागत आहे. अशा परिस्थितीत ताटकळत उभा राहण्याशिवाय पर्याय नसतो. पर्यायी एसटी बसची व्यवस्था देखील केली जात नाही. याबाबत वेळोवेळी लेखी तक्रारी करून देखील कोणतीही दखल घेतली गेली नाही. वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारची कारणे दिल्याचे एवढी नागरिकांनी सांगितले. वेळेत बस नसल्याने घरी येण्यास उशीर होत असल्याने विद्यार्थी व विद्यार्थिनी समोर अडचण निर्माण झाले असून पालक वर्ग देखील चिंतेत आहे. विद्यार्थ्यांवर महाविद्यालयात जाणे बंद करण्याची वेळ आली आहे.



### अजित पवार निर्णय घेणार का?

» दुपारी वेळेत दीड वाजता तसेच संध्याकाळी साडेचार वाजता संध्याकाळी सात वाजता बस सुरू करावी. तसेच सुप्याहून बारामतीकडे येण्यासाठी सकाळी सहा वाजता, पावणे नऊ वाजता व सकाळी साडेअकरा वाजता बस सेवा सुरू करावी अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. जास्त बस उपलब्ध होत नसतील तर एकच बस या वेळेत सुरू करावी. सीएनजी बस असल्यामुळे उशीर होतो अशी कारणे दिले जातात त्यामुळे सीएनजी बसऐवजी डीझेल बसची मागणी करण्यात आली आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे लेखी निवेदन देण्यात आले असून ते याबाबत काय निर्णय घेणार याकडे या परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### दिवस बसस्थानकातच काढावा लागतो

» दीड वाजता सुटणारी बस कधीही वेळेत डेपोमध्ये येत नसल्याची तक्रार नागरिकांनी बोलून दाखवली आहे. दीड वाजताची बस कधीकधी तीन वाजता डेपोत येते. याबाबत विचारणा केली असता उडवडीची उत्तरे दिले जातात. काही वेळेस दीडची बस संध्याकाळी सहा वाजता लावली जाते. त्यामुळे या परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांना दिवस बारामतीच्या बस स्थानकातच काढावा लागत आहे.